62

Dr. S.S. LIMAYE

0712-2582237 (34)

ATTN: SHULKA SAMITI
'A' Grade to Ramdeobaba
K.N. Engg. College, Nagpur.

**ANNEXURE B1**

राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे
गुणात्मक व दर्जानिहाय वर्गीकरण

---

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : टीईएस-२००४/(२९९/०४)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ जुलै, २००४

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
क्र.पीईसी-२००३/(२१२/०३)/तांशि-१, दि.१९ ऑगस्ट,२००३
२) संचालक तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांचे
क्र.२/एनजीसी/२००४/दर्जानिहाय वर्गीकरण/२३०७,दिनांक८ जून,
२००४ चे पत्र.

शासन निर्णय :- सन २००३-०४ पासून दोन वर्षासाठी राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे गुणात्मक आणि दर्जानिहाय वर्गीकरणास संदर्भाधीन दिनांक १९ ऑगस्ट,२००३ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. यामधील ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांना "ब "ते " ई " दर्जा देण्यात आला आहे अशा संस्थांनी तसेच ज्या संस्थांचा दर्जा प्रसिध्द करण्यात आलेला नाही त्या संस्थांनी जर पुढील शैक्षणिक वर्ष २००४-०५ साठी, त्यांच्या संस्थेचे दर्जानिहाय वर्गीकरण करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे पुन्हा अर्ज केल्यास व शासनाने विहीत केलेले शुल्क भरल्यास त्यांना दर्जा उंचावण्यास पुन्हा संधी देण्यात येईल. असे स्पष्ट करण्यात आले आहे.

त्यास अनुसरुन संदर्भाधीन दि.१९ ऑगस्ट,२००३ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट " अ " मधील विभागीय कार्यालय, मुंबई येथील अनुक्रमांक-१२ व विभागीय कार्यालय, नागपूर येथील अनुक्रमांक ७ मध्ये दर्शविलेल्या संस्थांनी दर्जा उंचावण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे अर्ज केले होते. तसेच २ महाविद्यालयांनी प्रथमच दर्जानिहाय वर्गीकरणासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे अर्ज केला होता. या चार महाविद्यालयांची तंत्रशिक्षण संचालनालयाने तपासणी करुन संचालनालय स्तरावर समिती गठीत करुन, त्यांनी संबंधित ४ संस्थांना जो सुधारीत दर्जा दिला आहे त्यास शासनाकडून मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये खालील ४ संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सुधारीत दर्जा देण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.:-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | यापूर्वी संस्थेला दर्जा मिळाल्याचे वर्ष व मिळालेला दर्जा | सुधारीत दर्जा |
|---|---|---|---|
| १. | विद्यावर्धिनीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, वसई, मुंबई | " क " दर्जा २००३ | " अ " दर्जा |
| २. | रामदेव बाबा कमला नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर | " ब " दर्जा २००३ | " अ " दर्जा |

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT
NAGPUR

63

35

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री.विठ्ठल एज्युकेशन रिसर्च इन्स्टिट्यूटचे. कॉलेज ऑफ इंजि.. ता.पंढरपूर, जि.सोलापूर | -- | " अ " दर्जा |
| ४. | पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी पिंपरी, पुणे | -- | " अ " दर्जा |

मात्र सदर दर्जा हा २००४-०५ पासून दोन वर्षासाठी राहील तसेच संस्थांना प्रदान करण्यात आलेल्या दर्जाचे पुनर्विलोकन दर २ वर्षानंतर करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्या. र. चौरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नागपूर
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता ).
~~[illegible]~~
निवड नस्ती तांशि-१

प्रत,
१) अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्टेडियम परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००
२) सहाय्यक शिक्षण सल्लगार (तांत्रिक) भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, (शिक्षण विभाग) पश्चिम क्षेत्रीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT
NAGPUR